**सेतु सुविधा केंद्रामधील जमा निधीचा**
**विभागीय आयुक्त कार्यालयासाठी विनियोग**

# महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक. मातंसं-२०१२/सीआर-८७/३९
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०३ मार्च, २०१२

**वाचा** : १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग मातंसं-०७/३७/३९ दि. १० ऑक्टोबर, २०११

**प्रस्तावना :**

जिल्हा सेतु सोसायटीकडे उपलब्ध होणाऱ्या निधीचा विनियोग जिल्ह्यातील सेतु केंद्रांच्या पायाभूत सुविधांमध्ये वाढ, ई-गव्हर्नन्स प्रकल्पांना चालना देण्यासाठी व त्या संदर्भात होणाऱ्या बाबींवर खर्च करण्याच्या अनुषंगाने संदर्भ क्र. १ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. विभागीय आयुक्त कार्यालयात ई-गव्हर्नन्स प्रकल्पांची अंमल बजावणी करावी लागते. त्या करिता मोठ्या प्रमाणात निधीची गरज भासत असते.

**शासन निर्णय :**

त्या अनुषंगाने शासन असा निर्णय घेत आहे की, विभागीय आयुक्त कार्यालयासाठी **विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या जिल्हा सेतु सोसायटी मार्फत** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग मातंसं-०७/३७/३९ दि. १० ऑक्टोबर, २०११ मधील **अनुक्रमांक ३ मधील (७५ टक्के रकमेच्या) खर्चाच्या तरतुदींनुसार** करण्यात यावा.

सदर शासन निर्णयाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली असून त्याचा संगणक सांकेतांक **२०१२०३०३१२४३७७१८००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रमोदकुमार पवार)
**विशेष कार्य अधिकारी *तथा***
**कार्यासन अधिकारी,**
**महाराष्ट्र शासन.**

(40)

**प्रति,**

मा. मुख्य सचिव,
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय मुंबई
प्रधान सचिव, महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई
प्रधान सचिव, (प्रशासकीय व पुनर्रचना), मंत्रालय मुंबई
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई
प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा सेतु सोसायटी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)